**BDC LIBRARY**

New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

# कोयना शिक्षण संस्थेच्या विद्यालयांचे बारावी परीक्षेत यश

पाटण, दि. २६ : येथील कोयना शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन केले. याबद्दल शिक्षकांसह विद्यार्थ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा निकाल ९८.६४ टक्के लागला असून प्राजक्ता कुंभार हिने ८९.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, समीर शिंदे याने ८७.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय व साक्षी अवघडे हिने ८५.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. विज्ञान शाखेचा निकाल ९८.१ टक्के लागला असून सिध्दी पाटील हिने ८३.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, समीक्षा पवार हिने ७५.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय व प्रज्ञा चव्हाण हिने ७५.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ७३.४ टक्के लागला असून सरिता शिंदे हिने ७९ टक्के मिळवून प्रथम, मिनाज आतार हिने ७६.८३ टक्के मिळवून द्वितीय, गुलशन सय्यद याने ७६.८३ टक्के मिळवून द्वितीय व भारती मोळावडे हिने ७६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

बँकिंग फायनान्सीयल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्समध्ये अमृता शिर्के हिने ७८.६७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, साक्षी कवर ७७.३३ टक्के मिळवून द्वितीय, दीप्ती बुजळे ७६.६७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. हॉर्टिकल्चरमध्ये रोहिणी गुजर हिने ७९ टक्के मिळवून प्रथम, करुणा पाटील ७८.८३ टक्के मिळवून द्वितीय व रूपाली जगताप ७७.३३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजीमध्ये सुजल कांबळे याने ७४.१७ टक्के मिळवून प्रथम, अनिकेत जाधव ६९.६७ टक्के मिळवून द्वितीय व आनंदा सूर्यवंशी ६७.३३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

ढोरोशी, ता. पाटण येथील श्रीमंत प्रतापसिंहराजे भोसले विद्यालय व कनिष्ठ विद्यालयाचा निकाल ९६.४२ टक्के लागला आहे. विद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून साक्षी सपकाळ हिने ७७.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, तनिष्का देवडकर हिने ६९.८३ टक्के मिळवून द्वितीय व प्रकाश वरक ६७.१७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेचा निकालही १०० टक्के लागला असून सूरज बोर्गे याने ८३ टक्के मिळवून प्रथम, आदिती महाडिक ७९ टक्के मिळवून द्वितीय व सलोनी घाडगे ७१.८३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ७६.९२ टक्के लागला असून सुजाता सपकाळ हिने ६०.१७ टक्के मिळवून प्रथम, अनुराधा साळुंखे ५६.८३ टक्के मिळवून द्वितीय व सोनाली बोर्गे ५६ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कोयनानगर येथील नेताजी सुभाषचंद्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील वाणिज्य शाखेचा निकाल ९०.५६ टक्के लागला असून श्रेया देसाई हिने ७७.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, स्नेहल मोहिते ७६.६७ टक्के मिळवून द्वितीय व मृदुला कदम ७५.३३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ८७.३६ टक्के लागला असून अश्विनी कोळेकर हिने ७४ टक्के मिळवून प्रथम, तेजल बल्लाळ ६५.१७ टक्के मिळवून द्वितीय व संतोष बावधाने ६४ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. अडूळ येथील श्री क्षेत्रपाल विद्यालयातील कला शाखेचा निकाल ८०.४८ टक्के लागला असून साक्षी डिगे हिने ६६.३३ टक्के मिळवून प्रथम, भूमी थोरात ५७.८३ टक्के मिळवून द्वितीय व अंकिता डिगे ५६ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. मोरगिरी येथील मोरणा विद्यालय व शामराव दाजीराव देशमुख ज्युनिअर कॉलेज निकाल ९४.११ टक्के लागला आहे. विद्यालयातील वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून स्वाती लाड हिने ८१.६७ टक्के गुण मिळवून प्रथम, आरती कोकाटे ७७.८३ टक्के मिळवून द्वितीय व राज पाटोळे ७५.८३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेचा निकाल ८८.६३ टक्के लागला असून राजश्री पवार हिने ६६.६७ टक्के मिळवत प्रथम. मच्छिंद्र पवार ६४.३३ टक्के मिळवत द्वितीय, अक्षय शिंदे ६४.३३ टक्के मिळवत द्वितीय व दिव्या मोरे ६३.६७ टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे कोयना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशराव पाटील, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी अभिनंदन केले.